विभाजित हृदय

दाजी

पूज्य श्री लालाजी महाराज यांच्या

153 व्या जयंतीनिमित्त संदेश

1, 2 आणि 3 फेब्रुवारी 2026, कान्हा शांति वनम्

विभाजित हृदय

प्रिय मित्रांनो,

पन्नाशीतले एक गृहस्थ माझ्यासमोर येऊन बसले. बाह्य निकषांनुसार, प्रत्येक बाबतीत ते यशस्वी होते पण त्यांचे हात किंचित थरथरत होते जेव्हा ते म्हणाले, “मला काय हवे आहे हे मी जाणून आहे, आणि मी काय करायला हवे, हेही मला समजते. असे असूनही जेव्हा तो क्षण येतो, तेव्हा मी नेमके तेच करत असतो जे पुन्हा कधीही न करण्याचे वचन मी स्वतःला दिलेले असते. प्रत्येक वेळी जेव्हा मी पडतो, तेव्हा मी माझ्यातील एक हिस्सा गमावतो. त्यानंतरचा पश्चात्ताप गुदमरून टाकणारा, चिरडून टाकणारा असतो, ती शरम जाळून टाकणारी असते आणि तरीही, त्याच वृत्तीची पुनरावृत्ती होते.”

ते हिंसा, चोरी किंवा दुसऱ्याचा विश्वासघात याबद्दल बोलत नव्हते. ते एका अशा गोष्टीबद्दल बोलत होते जी यापेक्षाही अधिक जिव्हाळ्याची, अधिक चिवट आणि तिच्या परीने अधिक विनाशकारी होती - मानवी मनात सतत धगधगणारे इच्छा-वासना आणि उच्च आकांक्षा यांच्यातील द्वंद्व.

ही स्वीकारोक्ती अनेक रूपांमधून समोर येते : मध्यमवयीन अधिकारी, जो आपल्या साचेबद्ध वृत्तींच्या विळख्यातून स्वतःला मुक्त करू शकत नाही; आध्यात्मिक साधक, जो काटेकोरपणे शुद्धीकरण करतो तरीसुद्धा पुन्हा त्याच प्रवृत्ती उफाळून वर येत

असल्याचे त्याला आढळते; आणि कुटुंबवत्सल मनुष्य, ज्याला बौद्धिकदृष्ट्या हे ज्ञात आहे की शाश्वत शांतीच्या बदल्यात क्षणभंगुर सुख म्हणजे एक अत्यंत नि:कृष्ट सौदा आहे, तरीही मोहाच्या क्षणी तो वाहवत जातो. तपशील बदलतात, तरी स्वरूप तेच राहते : एक विभाजित हृदय, ज्याचा एक भाग मुक्तीकडे ओढत असतो, तर दुसरा बंधनाकडे.

आंतरिक विभाजन

जेव्हा एखादी व्यक्ती म्हणते, "माझ्यातील एका भागाला मुक्तीची आस आहे तर दुसरा भाग इच्छेच्या मागे जाऊ पाहत आहे" तेव्हा याचा अर्थ काय होतो? याचा अर्थ असा की हृदयाने अजून कोणताही निर्णय घेतलेला नाही; किमान, त्याने ठाम निर्णय घेतलेला नाही. मुक्तीची आकांक्षा जितकी खरी आहे, तितकीच इच्छा-वासनांची ओढही. या दोन्ही गोष्टी एकाच वेळी अस्तित्वात आहेत आणि जोपर्यंत, अंतरी एक निर्णायक निग्रह होत नाही, तोपर्यंत संघर्षाच्या क्षणी, जी प्रेरणा अधिक प्रबळ असते, तिचाच विजय होतो.

हा संघर्ष, प्रेय आणि श्रेय म्हणजेच सुखकारक आणि श्रेयस्कर यांच्यातील आहे, असा संघर्ष जो वैदिक काळापासून ठळकपणे मांडला गेला आहे. जेव्हा मन दुभंगलेले असते, तेव्हा ती आंतरिक आर्त साद ईश्वरापर्यंत पोहचण्याकरिता आवश्यक असलेल्या अनुनादाचा तिच्यात अभाव असतो, कारण हृदयाचा अर्धा भाग अजूनही किनाऱ्याला कवटाळून बसलेला असतो.

अनेक साधक इथेच अडकलेले आढळतात. ते ध्यान करतात, संध्याकाळचे शुध्दीकरण करतात आणि दहाव्या सूत्राचे पालन करतात - रात्री झोपताना ईश्वराला समक्ष मानून, घडलेल्या चुकांबद्दल पश्चात्तापपूर्वक क्षमायाचना करतात व त्याच चुका पुन:पुन्हा न करण्याचे वचन देतात. आणि तरीही, ते वचन मोडले जात असते. मोडलेले प्रत्येक वचन एक किंमत वसूल करते - आत्मविश्वास कमी होतो, इच्छाशक्ती कमकुवत होते आणि सूक्ष्म नैराश्य स्थिरावू लागते, अशी भावना निर्माण होते की कदाचित, मुक्ती ही इतरांकरिता असेलही, पण त्यांच्याकरिता ती नाही.

काय चुकले आहे?

दोन लांडगे

अनेक संस्कृतींमध्ये, मानवी हृदयात राहणाऱ्या दोन लांडग्यांबद्दलची एक जुनी बोधकथा आहे. एक लांडगा आपल्या उच्च स्वभावाचे प्रतिनिधित्व करतो - संयम, दयाळूपणा, सत्य, शिस्त आणि जे शाश्वत आहे त्याविषयी प्रेम. दुसरा लांडगा आपल्या निम्न स्वभावाचे प्रतिनिधित्व करतो - आवेग, हाव, फसवणूक, उपभोगी वृत्ती आणि जे नश्वर आहे त्याविषयी आसक्ती.

एक तरुण आपल्या वडीलधाऱ्या व्यक्तीला विचारतो, “कोणता लांडगा जिंकतो?” वडीलधारी व्यक्ती उत्तर देते, “ज्याला तू खाऊ घालतोस.”

यातील शिकवण साधी आहे, परंतु तिची अंमलबजावणी मात्र साधी नाही. जो साधक चिवट इच्छेशी झुंजत राहतो, तो प्रत्यक्षात दोन्ही लांडग्यांना खाऊ घालत असतो. सकाळच्या ध्यानामध्ये, उच्च लांडग्याला त्याचा वाटा मिळतो आणि संध्याकाळच्या शुध्दीकरणामध्ये तो उच्च लांडगा अधिक बळकट होतो. स्पष्टतेच्या आणि निग्रहाच्या क्षणांमध्ये, उच्च लांडगा पुष्ट होतो.

मग एखादा असा क्षोभक विचार येतो आणि तो निम्न लांडगा, ज्यालासुध्दा उपभोग, कल्पना व आतुरता-अपेक्षा यांच्या चोरट्या आनंदातून पुष्ट केले गेले आहे, तो स्वत:च्या ताकदीनिशी उभा राहतो. आणि संघर्षाच्या त्या क्षणी, जो लांडगा अधिक बलवान असेल, तोच जिंकतो. समस्या ही नाही की साधकाचा स्वभाव निम्न आहे, तो सर्वांचाच असतो. समस्या ही आहे की दोन्ही लांडग्यांचे पोषण इतके संतुलित राहिले आहे, ज्यायोगे दोन्ही लांडगे जिवंत आणि तितकेच प्रबळ राहिले आहेत. हे युद्ध सुरूच राहते, कारण कोणतीही एक बाजू, निर्णायकपणे, कमकुवत होऊ दिलेली नाही.

केवळ शुध्दीकरण करणे पुरेसे का नाही?

हार्टफुलनेसची शुद्धीकरण प्रक्रिया गहन आहे. जसजसे दर संध्याकाळी साधक शुध्दीकरण-प्रक्रिया करण्यास बसतो व दिवसभरातील गुंतागुंत आणि अशुद्धता पाठीमागून बाहेर पडत आहे व समोरून दिव्य प्रकाश आत येत आहे अशी कल्पना करतो, तसतसे ठसे निघून जातात आणि संपूर्ण संरचना हलकी होते. मुक्ती निकट येऊ लागते. आणि तरीही काही साधक असे सांगतात की अनेक वर्षांच्या काटेकोरपणे केलेल्या शुध्दीकरणानंतरही, विशिष्ट प्रवृत्ती चिवटपणे रुतलेल्याच राहतात. त्यांच्या इच्छा-वासना परतून येतात, कधीकधी तर पूर्वीपेक्षाही जास्त तीव्रतेने, आणि त्यामुळेच वृत्ती तशीच राहते. का?

याचे कारण असे की शुद्धीकरण तेच काढून टाकते जे सोडून देण्यास हृदय तयार असते. जेव्हा एखादी प्रवृत्ती गुप्तपणे खोलवर जपली जाते, जेव्हा मनाचा एखादा कोपरा, छुप्या आसक्तीने तिला कवटाळून बसतो, तेव्हा शुद्धीकरणामध्ये अवरोध उद्भवतो.

तंत्र त्याच्या परीने कार्य करत राहते. ते खोलवर रुतलेले मूळ त्या ओळखीद्वारेच संरक्षित राहते.

जेव्हा साधक त्याच वृत्तीला पुन्हा एकदा बळी पडल्यानंतर संध्याकाळी शुद्धीकरण करतो, तेव्हा नेमके काय घडते ते पाहा. मनाला पश्चात्ताप होतो, हृदयाला खंत वाटते, क्षमायाचनेकरिता प्रार्थना केली जाते आणि एक वचन दिले जाते. वास्तवात, प्रश्न असा आहे : ते वचन किती अस्सल आहे?

प्रार्थना - उपचार की अंतरीचा भाव?

एखादी गोष्ट हवी असण्याची इच्छा करणे आणि ती प्रत्यक्षात हवी असणे यांत जमीन-अस्मानाचा फरक आहे. एखादा साधक, जो चिवट इच्छेने त्रस्त असतो, त्याला खरोखरीच मुक्तीची आस असू शकते. पश्चात्तापाच्या क्षणी, ती आस तीव्र असते. प्रार्थनेच्या वेळी ती आकांक्षा खरी वाटते. ध्यानाच्या शांततेत, ती मुक्ती अगदी दृष्टिपथात आली आहे असे वाटते.

मग तो क्षोभक क्षण येतो. अशी एखादी परिस्थिती उद्भवते आणि चेतासंस्थेत जुनी प्रवृत्ती पेटून उठते, ज्यातून बरेचदा, सुप्त मनात खोलवर गाडल्या गेलेल्या प्रतिक्रिया उमटतात. अचानक, काहीतरी उच्च प्राप्त करण्याची ती आकांक्षा संपूर्णपणे विरून जाते. जे उरते, ती इच्छेची स्वाभाविक ओढ असते आणि त्या क्षणी साधकाला हे उलगडते की त्या आकांक्षेची मुळे, खरोखर, किती उथळ, वरवरची होती!

एखादी गोष्ट हवी असण्याची इच्छा करणे आणि ती प्रत्यक्षात हवी असणे यांत जमीन-अस्मानाचा फरक आहे. एखादा साधक, जो चिवट इच्छेने त्रस्त असतो, त्याला खरोखरीच मुक्तीची आस असू शकते. पश्चात्तापाच्या क्षणी, ती आस तीव्र असते. प्रार्थनेच्या वेळी ती आकांक्षा खरी वाटते. ध्यानाच्या शांततेत, ती मुक्ती अगदी दृष्टिपथात आली आहे असे वाटते.

ही दांभिकता नव्हे तर हा मनुष्यस्वभाव आहे. समस्या ही नाही की मुक्तीची आस असल्याचा आपण आव आणतो. समस्या ही आहे की आपण अजूनही अशा तोडीची तीव्र आकांक्षा विकसित करू शकलो नाही, जी संघर्षाच्या क्षणीही तगून राहील. प्रार्थना खरी आहे परंतु ती हृदयपूर्वक नाही.

व्यापारी आणि साधू

एक परंपरागत कथा हे तत्त्व चांगल्या प्रकारे स्पष्ट करते. एक व्यापारी, जो आपल्या ग्राहकांना फसवणे थांबवू शकत नसल्यामुळे त्रस्त होता, एका साधूकडे आला.
तो म्हणाला, "मला माहीत आहे की हे चुकीचे आहे. दररोज संध्याकाळी मी प्रामाणिकपणाची शपथ घेतो, तरीही दररोज सकाळी, मी स्वतःला पुन्हा खोटेपणाने वागताना पाहतो. माझे काय चुकते आहे?"
साधूने विचारले, "जेव्हा तू संध्याकाळी शपथ घेतोस, तेव्हा तुला खरोखरीच प्रामाणिक व्हावे असे वाटते का?"
व्यापारी म्हणाला, "होय, अगदी पूर्णपणे!"

"आणि जेव्हा सकाळ होते आणि एखादा ग्राहक तुझ्यासमोर उभा असतो, तेव्हाही तुला प्रामाणिक राहावेसे वाटते का?"
व्यापारी क्षणभर थांबला आणि म्हणाला, "त्या क्षणी मला विक्री अधिक हवीहवीशी वाटते."
साधू म्हणाला, "मग तुझी संध्याकाळची शपथ एक माणूस घेत आहे आणि तुझी सकाळची निवड कोणी दुसराच करत आहे. जोपर्यंत ते दोघे एकच माणूस बनत नाहीत, तोपर्यंत तुझी शपथ अशीच मोडत राहील."

व्यापाऱ्याने विचारले की त्यांना एक कसे करावे?
साधूने उत्तर दिले, "तुला त्या विक्रीपेक्षाही अधिक मोलाचे काय वाटते, याचा शोध घ्यावा लागेल. जेव्हा तुला ते सापडेल, तेव्हा खोटेपणा स्वत:हूनच थांबेल."

इच्छाशक्तीचा क्षय

वारंवार येणाऱ्या अपयशामागे एक यांत्रिक तत्त्व कार्यरत असते. प्रत्येक पडझड संरचनेला, पुढच्या परीक्षेकरिता अधिक कमकुवत करते. विशिष्ट भार सहन करण्याच्या क्षमतेनुसार बांधकाम केलेला पूल एखाद्या वेळी थोडा जास्त भार सहन करू शकतो, परंतु जर असे वारंवार घडले, तर त्या पुलाला सूक्ष्म तडे जातात. जरी तो पूल भक्कम दिसत असला तरी आतून तो कमकुवत झालेला असतो. शेवटी, किरकोळ जास्त वाटणारे वजनही पूल कोलमडून पडण्यास कारणीभूत ठरते.

इच्छाशक्तीदेखील त्याचप्रमाणे कार्य करते. प्रत्येक वेळी, जेव्हा तिला डावलले जाते, प्रत्येक वेळी, जेव्हा उच्च अंतर्मनाचा स्पष्ट निर्णय इच्छा-वासनांच्या उसळत्या लाटेत बाजूला सारला जातो, तेव्हा कुठेतरी तडा जातो. हा तडा जरी अदृश्य असला, तरी हानी वाढत जाते.

म्हणूनच, वारंवार अध:पतन होत असलेले साधक, अनेकदा असे सांगतात की त्यांनी सुरुवात केली त्यापेक्षाही आता त्यांना अधिक कमकुवत झाल्यासारखे वाटते. त्यांना अपेक्षा होती की साधनेने ते अधिक मजबूत होतील परंतु वारंवार मोडलेल्या वचनांमुळे त्यांच्या इच्छाशक्तीचा पायाच खचतो. यावरील उपाय म्हणजे इच्छाशक्तीचा कस लावण्याचे टाळणे नव्हे, तर तिला अपयशाच्या सापळ्यात अडकण्यापासून रोखणे होय.

प्रामाणिक मूल्यमापन

रूपांतरणाचा आरंभ हृदयाच्या वास्तविक स्थितीबद्दलच्या कठोर प्रामाणिकपणातून होतो. आपल्यापैकी बहुतेक जण मुक्तीच्या प्रति आपल्या वचनबद्धतेचा अवास्तव अंदाज लावतात आणि आपल्या वृत्तींबद्दलच्या आसक्तीला कमी लेखतात. याच चुकीच्या मूल्यमापनामुळे अशी वचने दिली जातात जी पाळली जाऊ शकत नाहीत, ज्यामुळेच यापूर्वी स्पष्ट केल्यानुसार, इच्छाशक्तीचा क्षय होतो.

प्रामाणिक मूल्यमापन म्हणजे काय ? तर, याचा अन्वयार्थ म्हणजे कोणतीही शरम न बाळगता किंवा स्वतःचा बचाव न करता, आपल्या ओढीचे वास्तविक प्रमाण मान्य करणे. 1 ते 10 च्या मोजपट्टीवर, तुमची मुक्तीविषयीची आस केवढी आहे? आणि त्याच मोजमापाने, तुमच्या जुन्या प्रवृत्तीतून लाभणाऱ्या सुखाची तुमची हाव केवढी आहे?

अनेकांकरिता, याचे प्रामाणिक उत्तर नमवणारे असते. कदाचित मुक्तीची आस 5 किंवा 6 तर जुन्या प्रवृत्तींची ओढ 8 किंवा 9 असे प्रमाण असू शकते. हे पाहता, कोणत्याही संघर्षाचा निकाल उघड आहे. मात्र, यामुळे खचून जाण्याचे काहीच कारण नाही; उलट हीच वेळ आहे रणनीती आखण्याची. जर तुमची मुक्तीची आकांक्षा तुमच्या इच्छेच्या ओढीपेक्षा कमकुवत असेल, तर आधी त्या आकांक्षेवर काम करा. सध्याचे प्रमाण ज्याचे समर्थन करू शकत नाही, अशी वचने देत राहू नका, ज्यांचे पालन करणे झेपणार नाही. त्याऐवजी, केवळ ते प्रमाण बदलण्यावर लक्ष केंद्रित करा.

तळमळ कशामुळे वाढते?

ईश्वरासाठीची ओढ, तळमळ ही इच्छाशक्तीच्या जोरावर वाढत नाही; ती सान्निध्याने आणि त्या सान्निध्यामुळे होणाऱ्या तल्लीनतेने वाढते.

जेव्हा आपण ध्यानाला बसतो तेव्हा आपल्या जाणिवेच्या पलीकडे काहीतरी घडत असते. आपल्या संरचनेला दिव्य संप्रेषण, प्राणाहुती प्राप्त होते आणि त्यायोगे जी स्थिती प्रक्षेपित होत असते त्यातील काही अंश आपले हृदय शोषून घेते. कालांतराने, या निरंतर सान्निध्यामुळे एक नवीन मूलभूत स्तर, उंचावलेली सामान्य स्थिती आणि काय शक्य आहे, याची एक नवीन जाणीव निर्माण होते.

म्हणूनच सत्संग, सत्याचा संग, यावर जोर दिला जातो. एका सद्गुरुंच्या किंवा ज्याची तळमळ पूर्णत्वास पोहचली आहे, अशा समर्पित प्रशिक्षकाच्या उपस्थितीत, आपल्या हृदयात काहीतरी जागृत होऊ लागते. त्यांच्या उच्च ध्येयाच्या लहरींशी एक अनुनाद निर्माण होतो आणि आपल्या स्वतःच्या लहरीची पातळी बदलू लागते.

जेव्हा आपण ध्यानाला बसतो तेव्हा आपल्या जाणिवेच्या पलीकडे काहीतरी घडत असते. आपल्या संरचनेला दिव्य संप्रेषण, प्राणाहुती प्राप्त होते आणि त्यायोगे जी स्थिती प्रक्षेपित होत असते त्यातील काही अंश आपले हृदय शोषून घेते. कालांतराने, या निरंतर सान्निध्यामुळे एक नवीन मूलभूत स्तर, उंचावलेली सामान्य स्थिती आणि काय शक्य आहे, याची एक नवीन जाणीव निर्माण होते.

त्याचप्रमाणे, ज्यांनी हा प्रवास केला आहे त्यांचे शब्द वाचण्यात, आपल्या वृत्ती-प्रवृत्तींच्या पल्याड काय आहे याच्या चिंतनात व स्वतःवरील लक्ष हटवून सेवाकार्यात समय व्यतीत करणे; या सर्व गोष्टी उच्च लांडग्याला पुष्ट करतात तर निम्न लांडग्याला कमी लक्ष मिळते.

हा बदल हळूहळू होतो, जेणेकरून एक दिवस अचानक आपल्या लक्षात येते की सकाळी दुसऱ्याशी होणारा वाद आता वेगळा वाटतो. ती प्रतिक्रियात्मक जुनी ओढ, कदाचित, अजूनही तिथे असू शकते, परंतु आणखीही काहीतरी तिथे आहे - असे काहीतरी जे पूर्वी नव्हते किंवा अस्तित्त्वात होते पण कमकुवत होते. प्रमाण बदलले आहे.

आर्ततेची आंतरिक साद

बाबूजी महाराज यांनी एकदा असे नमूद केले होते की ईश्वराबद्दलची तळमळ जर भौतिक वस्तूंच्या तळमळीइतकीच तीव्र असती, तर साक्षात्कार क्षणार्धात झाला असता.

याचा अर्थ काय आहे ते समजून घेऊया. जेव्हा एखादी प्रबळ इच्छा निर्माण होते, तेव्हा ती आपल्या संपूर्ण संरचनेला व्यापून टाकते. विचार, भावना, शरीर आणि इच्छाशक्ती हे सर्व त्याच्या पूर्ततेसाठी एकवटतात. अवरोध कोलमडून पडतो कारण त्या प्रबळ इच्छेला विरोध करू शकेल, अशा तोडीची कोणतीही ताकद तिथे नसते. जर मुक्तीची इच्छा ही तितकीच सर्वसमावेशक असती तर काय झाले असते? तिला क्षुल्लक इच्छेशी लढा देण्याची गरजच भासली नसती, कारण तिने तिला सहजपणे

स्वत:मध्ये सामावून घेतले असते. ज्याप्रमाणे मोठी नदी लहान प्रवाहाला स्वत:मध्ये सामावून घेते, त्याचप्रमाणे मोठा प्रवाह सर्व प्रवाहांना एकाच दिशेने वाहून नेतो.

याच कारणामुळे, जी प्रार्थना हृदयातून आलेली नसते, ती आपल्यात बदल घडवू शकत नाही. म्हणूनच वरवरच्या पश्चात्तापाने, खोलवर रुजलेल्या वृत्ती-प्रवृत्तींवर काहीही परिणाम होत नाही. त्यांच्या तीव्रतेमध्ये विसंगती असते : मुक्तीची ओढ, तळमळ ही एका मेणबत्तीच्या ज्योतीसारखी असते, तर एखाद्या सवयीची ओढ एखाद्या मोठ्या शेकोटीसारखी असते. जोपर्यंत हे प्रमाण बदलत नाही, तोपर्यंत निकाल हा आधीच ठरलेला असतो.

कोश आणि फुलपाखरू

एकदा एका माणसाची नजर एका कोशावर पडली ज्यातून एक फुलपाखरू बाहेर पडण्यास धडपडत होते. कोशाचे छिद्र अतिशय लहान होते आणि फुलपाखरू तासनतास बाहेर येण्यासाठी झगडत होते. त्या माणसाला दया आली, त्याने कात्री घेतली आणि कोशाचे छिद्र पटकन कातरून मोठे केले. त्यामुळे फुलपाखरू सहज बाहेर आले खरे, पण त्याचे शरीर सुजलेले होते आणि पंख असे सुकून, आक्रसून गेले होते की त्यामुळे ते कधीच उडू शकणार नव्हते.

गोष्टीतील या माणसाला हे उमजले नाही की त्या लहानशा छिद्रातून बाहेर पडण्यासाठीची धडपड म्हणजे निसर्गाची रीत होती; ज्यायोगे फुलपाखराच्या शरीरातील द्रव त्याच्या पंखांमध्ये ढकलला जावा. ती तथाकथित अडचण, जी निष्ठूर वाटत होती, ती प्रत्यक्षात फुलपाखरामध्ये उडण्याची क्षमता विकसित करण्यासाठी अनिवार्य होती. त्याचप्रमाणे, जो साधक ईश्वराकडे आपल्या आध्यात्मिक प्रवासातील संघर्ष दूर करण्याची याचना करतो, तो कदाचित सुकून, आक्रसून गेलेले पंख घेऊन बाहेर पडण्याची मागणी करत असावा.

अनेक साधक त्यांच्या प्रवृत्तींपासून मुक्ती मिळावी म्हणून प्रार्थना करतात. ते ईश्वराकडे याचना करतात की त्यांच्या इच्छा-वासना काढून टाकून त्यांची इच्छाशक्ती बळकट

करावी, ज्यायोगे मार्ग सोपा व्हावा, परंतु बहुधा काहीही घडताना दिसत नाही. इच्छा- वासना तशाच राहतात, इच्छाशक्ती कमकुवतच राहते आणि मार्गही कठीणच राहतो. यामुळे काही साधक साशंक होतात आणि त्यांचा विश्वास डळमळीत होतो. त्यांना वाटते की ईश्वर ऐकत नाही, ईश्वराला काळजीच नाही किंवा ईश्वर अस्तित्वातच नाही... पण येथे दुसरी एक शक्यता आहे.

जर ईश्वराचा प्रतिसाद म्हणजे तो संघर्षच परिवर्तनासाठी उपयोगात आणणे हा असेल तर? संघर्ष हेच ते साधन असेल ज्याद्वारे साधक मुक्तीसाठी आवश्यक असलेली ती खरी ताकद विकसित करत असतो, असे असेल तर? पर्यायाचा विचार करा. जर विनवणी केल्यावर ईश्वराने प्रत्येक त्रासदायक प्रवृत्ती काढून टाकली, तर साधक आध्यात्मिकदृष्ट्या कायमचा बाल्यावस्थेतच राहील. खऱ्या मुक्तीकरिता गरजेची आंतरिक स्नायूंची ताकद, साधक कधीच विकसित करू शकणार नाहीत. ते प्रत्यक्षात

मुक्त न होताच, मुक्त होतील. संघर्ष हा ईश्वराच्या उदासीनतेचा पुरावा नव्हे; तो अभ्यासक्रम आहे.

खऱ्या पश्चात्तापाचा क्षण

खंत आणि पश्चात्ताप यांमध्ये फरक आहे. खंत म्हणते, “मी ते केले नसते तर बरे झाले असते. मला त्याबद्दल खेद वाटतो, आणि पुढच्या वेळी मी अधिक चांगले वागण्याचा प्रयत्न करीन.” पश्चात्ताप म्हणतो, “मी काय करत आलो आहे ते मी जाणतो, त्याची काय किंमत मोजावी लागते, तेही मी जाणतो; आणि आता यापुढे मी याप्रकारे वागू शकत नाही, हे मला उमजते. माझ्या अंतरी, आत्ता, या क्षणी काहीतरी बदलत आहे आणि मी एका वेगळ्या दिशेला वळत आहे.”

खंत ही भावनिक असते आणि बऱ्याचदा ती अपराधीपणा आणि शरमेच्या जड होत जाणाऱ्या ओझ्याशी संबंधित असते, याउलट पश्चात्ताप हा अस्तित्वाशी निगडित असतो. खंत ही जाणिवेच्या पातळीवर येतजात असली तरी आपल्या सुप्त वृत्तींवर तिचा पगडा राहतोच. याउलट, पश्चात्ताप हा पूर्वी आणि नंतर अशी स्पष्ट रेषा ओढतो आणि जुन्या वृत्तींना मोडून काढण्यासाठी कृतीची मागणी करतो.

खंत विरुद्ध पश्चात्ताप : परिवर्तनाचे विश्लेषण



बाबूजी महाराजांचे दहावे सूत्र[1] केवळ खंत नव्हे, तर खऱ्या पश्चात्तापाचे आवाहन करते. बाबूजींनी स्पष्ट केलेला शरणागतीचा मनोभाव हा आत्मदया किंवा दुःखाचा भाव नाही, तर ईश्वरासमक्ष बालसुलभ निरागसतेचा मनोभाव होय, जिथे काहीही लपवले जात नाही किंवा स्वतःच्या चुकांचे समर्थन केले जात नाही, तर केवळ हृदयाची वास्तविक स्थिती मांडली जाते व मदतीची याचना केली जाते.

जेव्हा पश्चात्ताप खरा असतो, तेव्हा तो अशी वचने देत नाही जी पाळली जाऊ शकणार नाहीत. त्याऐवजी तो म्हणतो, "मी हा असा आहे. मी हेच करत आलो आहे. मी हे थांबवू शकेन की नाही हे मला माहीत नाही, पण मला हे माहीत आहे की मला हे थांबवण्याची इच्छा आहे. कृपया मला साहाय्य करा." अशी प्रार्थना आपल्या जुन्या वृत्ती आणि प्रवृत्तींपेक्षाही खोलवर पोहचते. असा प्रामाणिकपणा त्या ईश्वरी कृपेचा मार्ग खुला करतो, जिथे प्रयत्न अपुरे पडतात..

आपल्या प्रवृत्तींना काय हवे असते?

एक रहस्य आहे, जे इच्छांशी असलेले आपले नाते त्वरित बदलून टाकते. आपल्या प्रवृत्तींना जे वरकरणी हवेसे वाटते ते नको असते, तर त्या प्रत्यक्षात काहीतरी खोलवर असलेल्या गोष्टीकडे निर्देश करत असतात. शारीरिक सुखाची ओढ ही मुळात मीलनाची ओढ असते. क्षणिक समाधानासाठीची अस्वस्थ धडपड ही मुळात शाश्वत तृप्तीचा शोध असते. नश्वर गोष्टींशी असलेली आसक्ती ही मुळात जे शाश्वत आहे, त्याला धरून ठेवण्याची धडपड असते. या प्रवृत्ती जे शोधत आहेत ते चुकीचे नसते; तर त्या जिथे शोधत आहेत ती जागा चुकीची असते.

जेव्हा हे उमजते, तेव्हा आपल्या प्रवृत्तींशी युद्ध करण्याऐवजी त्यांना करुणेने सामोरे जाता येते. "तुम्ही काय शोधण्याचा प्रयत्न करत आहात हे मी जाणतो. तुम्ही जे शोधत आहात ते येथे नाही, पण ते कोठे आहे हे मला माहीत आहे. माझ्यासोबत चला."

---

[1] राम चंद्र, 2019. सहजमार्गाच्या दहा सूत्रांवरील भाष्य. श्री राम चंद्र मिशन, भारत.

हा प्रतिसाद एखाद्या प्रवृत्तीशी लढण्यापेक्षा, किंवा तिचे अस्तित्व दडपण्यापेक्षा किंवा नाकारण्यापेक्षाही वेगळा आहे. लढण्यामुळे दोन्ही बाजू केवळ अधिक प्रबळ होतात, आणि नाकारल्यामुळे ती सुप्त मनात खदखदत राहते, जिथून ती पुन:पुन्हा उसळी मारून वर येऊ शकते. याउलट, त्या प्रवृत्तीवर प्रकाश टाकल्याने, तिच्या मुळाशी असलेले अज्ञान विरून जाते.

असे वळण जे सर्वकाही बदलून टाकते

प्रवासात एका ठराविक टप्प्यावर काहीतरी बदलते. तो काही नाट्यमय बदल नसतो आणि त्यात कोणताही गाजावाजा नसतो. अनेकदा, आपल्या ते त्वरित लक्षातही येत नाही, परंतु आपल्या गुरुत्वाकर्षणाचे केंद्र बदलते. त्यापूर्वी हृदय सुखाकडे झुकलेले असते आणि अधूनमधून मुक्तीकडे नजर टाकत असते. आता ते हृदय मुक्तीकडे झुकलेले असते आणि अधूनमधून जुनी प्रवृत्ती मागे ओढू पाहते. ही ओढ सुरूच राहते, पण दिशा बदललेली असते.

हा बदल जबरदस्तीने घडवून आणता येत नाही, पण आपण त्यासाठी तयारी करू शकतो. नाव चालवण्यास शिकणारा माणूस, सोसाट्याचा वारा आणि आदळणाऱ्या लाटांमुळे, नवशिक्या माणसाची नाव उलटून बुडेलही, परंतु कालांतराने, सातत्यपूर्ण सरावाने, कोणत्याही हवामानात नाव चालवण्यात तो निपुण होईल. त्याचप्रमाणे आपली साधना - रोजचे शुध्दीकरण, रोजचे ध्यान, प्रामाणिक मूल्यमापन, पुन:पुन्हा खाली पडण्यातून जमा झालेले परिणाम आणि आपल्या जुन्या वृत्ती-प्रवृत्तींच्या पल्याड जे आहे, त्याच्याशी वाढत जाणारी जवळीक, आपल्याला पुढच्या प्रवासासाठी तयार करते. त्यानंतर, ईश्वरकृपेने तो बदल स्वत:च, योग्य वेळी घडतो, जेव्हा हृदय तयार असते.

त्याच्यासाठी जो सतत पडत आहे

जर तुम्ही हे वाचत असाल आणि तुम्हाला स्वत:चा संघर्ष यात दिसत असेल, तर हे जाणून घ्या की तुमचे खाली पडणे वाया गेलेले नाही. प्रत्येक पडझडीने तुम्हाला अनुभूतीचा ठेवा दिला आहे आणि प्रत्येक वेळी सावरण्यातून काहीतरी नवीन घडवले आहे. तुम्हाला याचे ओझे वाटते ही वस्तुस्थितीच सूचित करते की तुमच्यात असे काहीतरी आहे, ज्याने अजून हार मानलेली नाही.

आता गरज आहे ती त्याच प्रकारच्या अधिक प्रयत्नांची नाही, तर इच्छेच्या गुणवत्तेत बदल करण्याची. येथे काही सूचना आहेत :

अशी वचने देणे थांबवा जी तुम्ही पाळू शकत नाही. त्याऐवजी, एक प्रामाणिक मूल्यमापन करा : तुम्हाला प्रत्यक्षात मुक्ती केवढी हवी आहे? त्याचे मोजमाप तुमच्या इच्छा-वासनांच्या वृत्तीप्रवृत्तींकडे तुमची ओढ किती प्रबळ आहे, यावरून ठरवा. वास्तविक राहा, निर्भिड व्हा आणि या दोन्ही परस्परविरोधी ओढींच्या तीव्रतेला जाणून घ्या.

त्यानंतर स्वतःला विचारा, "या दोन्हींमधील प्रमाण कसे बदलता येईल?" हे इच्छाशक्तीने किंवा नैतिक धडपडीने घडणार नाही; तर ते मोठ्या भुकेला शमवून आणि लहान भुकेला उपाशी ठेवून घडेल. हे साध्य होईल जेव्हा तुम्ही स्वतःला अशा प्राणाहुतीसमोर समर्पित कराल जी खोलवरची ओढ, तळमळ जागृत करते, आणि अशा लोकांच्या सान्निध्यात राहाल ज्यांची दिशा तुम्हाला तुमच्या स्वतःच्या सर्वोच्च शक्यतेची आठवण करून देते.

वचन जे पाळण्यायोग्य आहे

एक वचन आहे जे पाळण्यायोग्य आहे - प्रयत्न करत राहण्याचे वचन. प्रत्येक वेळी यशस्वी होण्याचे वचन देण्यात काहीच अर्थ नाही, कारण त्याची हमी देणे मानवी मर्यादेच्या पलीकडे आहे. प्रयत्न करत राहणे, पडलो तरी पुन्हा उठत राहणे आणि हृदयाला, जे सर्वोच्च आहे त्याकडे वळवत राहणे, हे मात्र पूर्णपणे आपल्या हाती आहे.

ईश्वरी शक्ती तुमच्या प्रगतीचे मोजमाप अपयशाच्या अनुपस्थितीवरून करत नाही तर तुमच्या धडपडीच्या सातत्यावरून करते. जो साधक हजार वेळा पडतो आणि एक हजार एक वेळा पुन्हा उठून उभा राहतो, त्याने एक महत्त्वाची गोष्ट सिद्ध केलेली असते, त्याने मार्ग सोडून देण्यास नकार दिलेला असतो. हा नकार, स्वतःच, एक विजय आहे आणि हे सातत्य, ही चिकाटी स्वतःच एक परिवर्तन आहे. कालांतराने, जे जिद्दीने, तर कधीकधी यंत्रवत प्रयास म्हणून सुरू झाले होते, त्यात परिपक्वता येते व त्याचे स्वाभाविक प्रवृत्तीत - तळमळीत रूपांतर होते. पूर्वी जो संघर्ष होता, तो एक सहज प्रवाह बनतो आणि जे विभागलेले होते, ते आता संपूर्ण बनते.

हे विभाजित हृदय कायम असेच दुभंगलेले राहत नाही.
एक दिवस सहज, कोणत्याही गाजावाजाशिवाय, त्याला त्याची दिशा सापडतेच.
आणि जेव्हा हे घडते, तेव्हा त्या हृदयाला नवल वाटते की आपण इतरत्र का भरकटत होतो?

हे अंतरीचे द्वंद्व खरे आहे. त्यातून पार जाण्याचा मार्ग म्हणजे प्रामाणिक ओढ, तळमळ. त्याचा परिणाम चेतनेच्या स्वरूपात पूर्वीच लिहिला गेला आहे - जे सत्य आहे तेच तगून राहते आणि जे असत्य आहे ते गळून पडते. तुमचे काम आहे त्या सत्याशी स्वतःला जोडून घेणे, पुन:पुन्हा, जोपर्यंत ते अढळ, शाश्वत होत नाही.

त्या सत्याशी एकरूप होणे म्हणजेच मुक्ती आहे.
आणि हीच मुक्ती तुम्हाला तुमच्या घराकडे परतण्याचे आवाहन करत आहे.

ॐ शांति: शांति: शांति:

प्रेम व आदरपूर्वक,
कमलेश
पूज्य श्री लालाजी महाराज जयंती, फेब्रुवारी 2, 2026

पूज्य श्री लालाजी महाराज यांच्या
153 व्या जयंतीनिमित्त संदेश
1, 2 आणि 3 फेब्रुवारी 2026, कान्हा शांतिवनम्



पूज्य दाजी यांच्यासोबत मास्टरक्लासेस

तुम्ही हार्टफुलनेस ध्यानाची सुरुवात केव्हाही करू शकता! पूज्य दाजी यांच्यासोबत तीन भागांच्या मास्टरक्लास मालिकेत सामील व्हा. यामध्ये, हार्टफुलनेस ध्यानपद्धतीचे काय फायदे आहेत, तसेच तुमच्या दैनंदिन दिनचर्येत हार्टफुलनेस शिथिलीकरण, ध्यान, शुद्धीकरण आणि प्रार्थनेचा समावेश कसा करावा, हे दाजी स्पष्ट करून सांगतात. हे मास्टरक्लासेस विनामूल्य आहेत.

https://heartfulness.org/in-mr/masterclass/

हार्टफुलनेस ध्यानपद्धतीचे सराव

हार्टफुलनेसच्या सरावांची अनुभूती घ्या व शिका - हार्टफुलनेस शिथिलीकरण, ध्यान, शुद्धीकरण व प्रार्थना.

https://heartfulness.org/in-mr/heartfulness-practices/

heartfulness
purity weaves destiny